# प्रेसनोट

**गुन्हे शाखेच्या गुंडास्कॉड उत्तर विभागाने पुणे व पिंपरी-चिंचवड परीसरातुन विधीसंघर्षग्रस्त बालकाने चोरलेली ६ दुचाकी वाहने केली हस्तगत.**

दि.०९/०८/२०१८ रोजी भानुप्रताप बर्गे सहा.पोलीस आयुक्त गुन्हे २ पुणे शहर यांच्या आदेश व मार्गदर्शनाखाली संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक उत्तर विभाग गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी पिंपरी भागात गुन्हेप्रतीबंधक पेट्रोलींग फिरत असताना पो.शि. दत्ता फुलसुंदर यांना एक विधीसंघर्षग्रस्त बालक सुझुकी ॲक्सेस मोपेड आरटीओ नंबर प्लेट काढुन ती विक्री करण्यासाठी शगुन चौक पिंपरी पुणे येथे येणार असल्याचे मिळालेल्या बातमीवरुन तो सदर मोपेड गाडीसह संशयीतरीत्या मिळुन आल्याने त्यास मोपेड गाडी सह ताब्यात घेवुन त्याच्याकडे केलेल्या सखोल चौकशीमध्ये त्याने ती गाडी वायसीएम हॉस्पीटल पिंपरी येथुन चोरल्याचे व आणखीन ५ दुचाकी वाहने चोरल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याकडुन चोरीचे १ सुझुकी ॲक्सीस, १ टिव्हीएस वेगो, १ हिरोन्डा पॅशन, २ यामाहा एफझेड, १ हिरोहोन्डा स्प्लेंडर अशा एकुण ६ दुचाकी गाडया किं.रु ०२,१०,०००/- च्या जप्त करण्यात आल्या आहेत. त्या गाडया त्याने पिंपरी, पुणे कॅम्प, शिवाजीनगर वगैरे भागातुन चोरलेल्या असुन त्याबाबत संबंधीत पो.स्टे. ला गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त श्री शिरीष सरदेशपांडे, गुन्हे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२, श्री. भानुप्रताप बर्गे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, सपोफौ नरेंद्र सोनवणे, भालचंद्र बोरकर, शितल शिंदे, रमेश भिसे, प्रदीप शेलार, दत्ता फुलसुंदर, अतुल मेंगे, नवनाथ चांदणे, कांतिलाल बनसोडे, यांनी केलेली आहे.